# सत्तेत राहायचंय मला...

संपादकीय

जयश्री खाडिलकर-पांडेकृत

महाराष्ट्रातील फडणवीस सरकार २०१९ पर्यंत अगदी आरामात टिकणार याची सर्वांनी खात्री ठेवावी. या आत्मविश्वासामुळेच कितीही टीका झाली तरी मुख्यमंत्री फडणवीस ढुंकून बघत नाहीत.

पुण्याच्या कचऱ्याच्या प्रश्नाचं काय झालं ते लक्षात घ्या. फुरसुंगीचे ग्रामस्थ २२ दिवस आंदोलन करीत होते, पण कुणी तिकडे फिरकले नाहीत. आपले मुख्यमंत्री तर आंब्याच्या पानांचा टाळ झाले आहेत. कुठलाही समारंभ असला की आंब्याच्या पानांचा टाळ लागतो, तसं सरकारच्या कोणत्याही खात्याचा समारंभ असला तरी उद्घाटन मुख्यमंत्रीच करतात. त्यासाठी ते भीरभीर हेलिकॉप्टरने फिरत असतात. अशा या मुख्यमंत्र्यांनाही २२ दिवस या प्रश्नाकडे पाहायला वेळ मिळाला नाही. २३ व्या दिवशी नेमके भाजपाचे दोन दिग्गज काकडे आणि सुभाष देशमुख यांच्या घरच्या विवाहासाठी मुख्यमंत्र्यांना पुण्यात यावेच लागले आणि मग थोडा वेळ काढून ते ग्रामस्थांना भेटले. गेली २० वर्षे ग्रामस्थ लढत असून मुख्यमंत्र्यांनी कोणताही निर्णय दिला नाही. एक महिन्यात मार्ग काढतो, इतकेच मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले आणि ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले. बिच्चारे, करतील काय? हेच सरकार अजून किमान अडीच वर्षे राहणार आहे. त्यामुळे जास्त न ताणलेले बरे, असा योग्य निर्णय ग्रामस्थांनी घेतला. आज राज्यात ज्या ज्या समस्या आहेत, गंभीर प्रश्न आहेत त्या सर्वांच्या बाबतीत हेच घडते आहे. भाजपाच्या विरोधात गेलो तर मरू त्यापेक्षा गप्प बसा, असे म्हणत आंदोलने गुंडाळली जात आहेत.

ही परिस्थिती का निर्माण झाली आहे? कारण आज काँग्रेस आणि राष्ट्रवादीची विरोधाची ताकदच नाही. ज्यांनी घाण केली ते दुर्गंधी येते म्हणून ओरडूच शकत नाहीत. मनसेबद्दल लिहिण्यासारखे काही उरले नाही. त्यामुळे फडणवीस सरकारच्या अयोग्य निर्णयांचा विरोध करण्याची ताकद फक्त त्यांच्याच बरोबर सत्तेत असणाऱ्या मित्रपक्षांकडेच आहे. पण हे सर्वच्या सर्व मित्रपक्ष एकसुरात एकच बोलतायत, सत्तेत राहायचंय मला! त्यामुळे सरकार टिकणार, हे शंभर टक्के सत्य आहे. सरकार निर्धास्त, मुख्यमंत्री बिनधास्त अशी स्थिती यातूनच निर्माण झाली आहे.

शिवसेनेने आता मराठवाड्यात संपर्क यात्रा सुरू केली आहे. ही यात्रा शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी नाही तर २०१९ च्या निवडणुकीच्या तयारीसाठी आहे. शेतकऱ्यांना कर्जमुक्ती दिली नाही तर आरपारची लढाई लढू, या आरोळ्या आतापर्यंत शंभर वेळा ऐकल्या आहेत. २०१९ पर्यंत सत्ता उपभोगायची आणि मग निवडणुकीवेळी भाजपाने हाकलले की आरपारची लढाई करायची इतकी ही आरपार पारदर्शक बोटचेपी भूमिका आहे.

भाजपा रोज येता-जाता शिवसेनेच्या टपलीत मारतं तरी पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली २०१९ ची निवडणूक लढायची, या प्रस्तावावर शिवसेनेने सही केली. शिवसेना म्हणते की, हिंदू राष्ट्र या ध्येयासाठी आम्ही भाजपाबरोबर आहोत. मोदी सरकारने आंतरराष्ट्रीय पातळीवर जाहीर केले की, भारत हा निधर्मी देश आहे. शिवसेना म्हणाली की, सरसंघचालकांना राष्ट्रपती बनवा. भाजपाने या वक्तव्याकडे लक्षच दिलं नाही. समृद्धी मार्गाला शिवसेनेचा विरोध आहे, पण जमिनी ताब्यात घेण्याचे काम सरकारने थांबवले नाही. तूरडाळीचा इतका घोळ झाला तरी शिवसेनेला काही करता आले नाही. मुंबईचा विकास आराखडा शिवसेनेला मान्य नाही. तरी भाजपा लक्ष देत नाही. जैतापूर हे शिवसेनेचे अडचणीचे दुखणे आहे. त्यावर लेप लावायचे सोडाच, भाजपा सरळ जैतापूर सुरू करण्याचे करार करीत सुटली आहे. 'वांद्र्याचे साहेब आणि त्यांचे सचिव' इथपर्यंत भाजपाने हात घातला, पण शिवसेनेला कॉलर सोडवता येत नाही. सर्वात कळस म्हणजे तमाम महाराष्ट्राचे आदरस्थान असलेले स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक बांधण्यासाठी शिवसेना या मुंबईत अजूनही जागा मिळवू शकत नाही.

पण काहीही झालं तरी सत्ता सोडायची नाही. शिवसेनेच्या मंत्र्यांना काही सांगत नाहीत, त्यांचे प्रस्ताव मंजूर करीत नाहीत, त्यांचा निधी अडवतात अशी अवस्था वेळोवेळी जाहीर करता, मग खुर्चीला कशासाठी चिकटून बसला आहात?

फक्त मुखपत्रातून विरोधात लिहायचे आणि बाहेर गप्प बसायचे, हे किती दिवस जनतेने पाहत बसायचे. यात कहर म्हणजे मुखपत्रात मथळा आहे- फासावर नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा! होय, शेतकऱ्यांची आज हीच स्थिती आहे. पण मग शिवसेना काय करणार आहे? शिवसेनेला भाजपाने जल्लादाच्या नोकरीवर ठेवले आहे का?

जशी शिवसेना तशीच स्वाभिमानी शेतकरी संघटना आहे. या संघटनेचा स्वाभिमान खुर्चीच्या वजनात कधीच मेलाय. आता शेतकऱ्यांसाठी राजू शेट्टी मुंबईवर मोर्चा काढणार आहेत. ते भाजपाच्या शेतकरी धोरणावर सडकून टीका करतायत, पण त्यांचा मंत्री सदाभाऊ खोत खुर्ची सोडत नाही. भाजपाचे सरकार भ्रष्टाचार करतेय का याच्या फायली बघायला सदाभाऊ खोतांना सत्तेत ठेवलंय, असं राजू शेट्टी म्हणतात. हे बोलताना काही वाटत नाही? साखर कारखान्यांच्या घोटाळ्याच्या फाईल सरकारकडे आहेत, पण कारवाई होत नाही, असा आरोप राजू शेट्टी करतात. मग हा पर्दाफाश करण्यासाठी सदाभाऊ खोतना पत्रकार परिषद घ्यायला सांगायला हिंमत आहे तेवढी? २०१९ च्या निवडणुकीत दोन तरी आमदार निवडून यावे म्हणून मोर्चे काढतात. संघटना संपेल म्हणून सभेत सरकारच्या विरोधात बोलतात. आता राजू शेट्टी मुंबईत मोर्चा घेऊन आले की ज्या सरकारच्या विरोधात ते मोर्चा काढणार आहेत, त्या सरकारमध्येच सत्तेची खुर्ची उबवत बसलेले सदाभाऊ खोत मुंबईच्या वेशीवर उभे राहून त्यांना ओवाळणार आहेत. हा शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा नाही. ही शेतकऱ्यांची क्रूर फसवणूक आहे.

महादेव जानकर आणि विनायक मेटे हेही याच पंगतीत बसलेले आहेत. धनगर आरक्षणाच्या घोषणा देत महादेव जानकर मंत्री बनले आणि आरक्षणाचा मुद्दाच विसरले. धनगरांना आरक्षण मिळवून देऊन त्यांचा शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय स्तर उंचावायचा हा विषयच त्यांच्यासाठी महत्त्वाचा नाही. त्यांना आता त्यांचा राष्ट्रीय समाज पक्ष वाढवायचा आहे. एकाचे चार आमदार करायचे, पुन्हा मंत्रीपद मिळवायचं हेच धोरण आहे. यातून समाजकल्याण करणार असं ते सांगतात. त्यामुळे आरक्षण हा मुद्दाच त्यांच्यासाठी गौण झाला आहे. मग या मुद्यावर सत्ता कशाला सोडायची? विनायक मेटेंना तर पक्षवाढीचीही आस नाही. मुंबईची एक सीट आली की झालं. छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचं अध्यक्षपद दिले आणि विनायक मेटेंना कायमचे थंड केले. स्मारकाच्या समारंभात त्यांना अपमानास्पद डावललं तेव्हा मेटेंनी फक्त कुरकुर केली. त्यानंतर समाजासाठी त्यांचा आवाजच येत नाही.

महाराष्ट्रात शेतकऱ्यांची, कामगारांची, सामान्य माणसाची स्थिती अधिकाधिक वाईट होत आहे. फडणवीस सरकारचे निर्णय त्यांना जीवघेणे ठरत आहेत. तरीही ग्रामपंचायत ते पालिका भाजपालाच मते पडतायत. हे असे का होते आहे? इव्हीएम घोटाळ्यामुळे हे घडतंय, असा आरोप होतो आहे. पण यात तथ्य नाही. मग भाजपाच्या यशाचे कारण काय? भाजपाच्या यशाचे एकच कारण आहे. भाजपाला विरोध करण्याची ताकद आज ज्या पक्षांत आहे, ते पक्ष सत्तेला चिकटून बसले आहेत. सत्तेच्या हव्यासापोटी जनतेला न्याय मिळवून देण्यात अपयशी ठरले आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी तर जनतेच्या मनातून उतरलीच आहे, पण मित्रपक्षांची लाचारीही जनतेला दिसतेय. जनता विचार करतेय की, भाजपालाच मते देऊ. ते चांगलं करतील किंवा वाईट करतील. पण काहीतरी करतील तरी. बाकीचे तर काहीच करणार नाहीत. भाजपाला यामुळेच यश मिळते आहे. सत्तेवर राहायचंय मला... हे धोरण मित्रपक्ष सोडणार नाहीत तोवर सरकार बिनधास्त, मुख्यमंत्री निर्धास्त!